२८ एप्रिल, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7447744100 (PRO)


# चंद्रपुर पोलीसांचा शहरातील मुख्य मार्गाने रुट मार्च

### १५ पोलीस अधिकारी व २२२ पोलीस कर्मचारी यांचा सहभाग

सद्या कोरोना विषाणुच्या संसर्गाने संपुर्ण जगभरामध्ये थैमान घातले असुन चंद्रपुर जिल्हा पोलीस विभाग कोरोना विषाणु जिल्हयात पसरू नये यासाठी आपले दैनंदिन कर्तव्य बजावत सर्वोतोपरी योग्य त्या उपाययोजना करीत आहेत. पोलीसींगचा एक भाग म्हणुन व संचारबंदीत विनाकारण बाहेर पडणाऱ्या नागरीकांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली चंद्रपुर शहरामध्ये मुख्य मार्गाने रुट मार्च काढण्यात आला.

आज दिनांक २८ एप्रिल २०२० रोजी सकाळी १० वाजता पासुन पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर हद्दीमध्ये जटपुरा गेट—गिरनार चौक—दादमहल वार्ड—पठाणपुरा गेट—मिलन चौक—गांधी चौक—लक्ष्मी नारायण मंदीर—जयंत टॉकीज—छोटी बाजार चौक— जटपुरा चौक या प्रमुख मार्गाने रुट मार्च काढण्यात आला. आज रोजी चंद्रपुर पोलीसांनी काढलेल्या या रुट मार्चमध्ये स्वत: पोलीस अधीक्षक डॉ. श्री. महेश्वर रेड्डी हे सुध्दा स्वत: हजर होते. सदर रुटमार्चमध्ये पोलीस उपविभागीय अधिकारी चंद्रपुर शहर श्री. शिलवंत नांदेडकर, ठाणेदार पोस्टे चंद्रपुर शहर, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, वाहतुक शाखा प्रभारी अधिकारी सि ६०, दंगा नियंत्रण पथक असे एकुण १५ पोलीस अधिकारी आणि २२२ पोलीस कर्मचारी यांनी या रुट मार्चमध्ये सहभाग घेतला. शहरातील उर्वरीत मार्गाने सुध्दा पुढील दोन दिवस अशाचप्रकारे रुट मार्च काढण्यात येणार आहे. चंद्रपुर पोलीसांद्वारे जनतेला आवाहन करण्यात येत आहे की, जोपर्यंत लॉकडाउन आहे तोपर्यंत विनाकारण घराबाहेर न येता प्रशासनाने दिलेल्या नियमांचे उल्लघंन करु नये. अशाप्रकारे नियमाचे उल्लघंन करणारे व्यक्तींवर नियमांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. करीता नागरीकांनी सर्व नियमांचे पालन करुन पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.

———————————————————————————————————

चंद्रपूर जिल्हा पोलीस
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२८ एप्रिल, २०२०
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# निजामुद्दीन दिल्ली (मरकज) येथुन चंद्रपुर येथे आलेल्या विदेशी नागरीकांना शहर पोलीसांनी केली अटक

कोरोना विषाणू संसर्ग सुरु असतानाच निजामुद्दीन दिल्ली येथुन चंद्रपुर येथे ११ विदेशी नागरीक हे टुरीस्ट व्हिसा घेवुन, २ भारतीय परराज्यातील नागरीकांसह चंद्रपुर येथील छोटी मस्जीदमध्ये आले होते. चंद्रपुर येथे आल्यानंतर नमुद विदेशी नागरीकांनी जिल्हयातील ईतर ठिकाणी प्रवास करुन त्यांनी व्हिसाचे व प्रशासनाने दिलेल्या नियमांचे उल्लघंन केल्याने त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे अपराध क्रं. २५२/२०२० कलम १८८,२६९,२७०, भादंवि सह कलम ७ (क)२) १४ (बि)(सि) विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६, अन्वये दिनांक ०५/०४/२०२० रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता. त्या दरम्यान आपत्ती व्यवस्थापन व स्थानिक प्रशासनाकडुन यासर्व १३ नागरीकांना चंद्रपुर येथील रेंजर कॉलेज व वसंतभवन येथे संस्थानिक विलगीकरण करण्यात आले होते. त्यांचा विलगीकरणाचा कालावधी संपल्यांनतर नमुद ११ विदेशी व २ परराज्यातील भारतीय नागरीकांना त्यांचे विरुध्द दाखल असलेल्या वरील गुन्हयामध्ये आज रोजी चंद्रपुर शहर पोलीसांनी अटक करुन न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांचा न्यायालयीन रिमांड मंजुर केला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास चंद्रपुर शहर पोलीस करीत आहे.

---

# चंद्रपूर जिल्हा पोलीस

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२८ एप्रिल, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

## चंद्रपुर जिल्हयामध्ये विनापास कोणीही प्रवेश करुन नये

### अत्यावश्यक कारणाशिवाय, विनापरवाना प्रवेश करण्यास मनाई

कोरोना विषाणूचा संसर्ग सर्व जगभर पसरला असताना प्रशासनाने याबाबत नियमावली तयार केली असुन नागरीकांना नियमांचे पालन करण्याबाबत वेळोवेळी आवाहन करण्यात आले आहे. तरीही नागरीक अत्यावश्यक कारण नसताना सुध्दा बाहेर जिल्हयामध्ये जाण्याची परवानगी मिळणेकरीता विनाकारण घराबाहेर निघुन कार्यालयामध्ये येतात. चंद्रपुर जिल्हयाशेजारील यवतमाळ व नागपुर या दोन्ही जिल्हयामधील स्द्यपरीस्थिती पाहता, चंद्रपुर जिल्हयातील नागरीकांनी जास्त खबरदारी घेणे आवश्यक असल्याने ज्यांना अंत्यत आवश्यक (मेडीकल अत्यावशक्यता) बाबीकरीता बाहेर जिल्हयामध्ये जाणे असल्यास covid19.mhpolice.in या पोर्टल वर नोदंणी करावी. अत्यावश्यक कारण असल्यासच परवानगी पास देण्यात येईल. तसेच विनापास/विनापरवानगी कोणीही दुसऱ्या जिल्हयातुन चंद्रपुर येथे प्रवेश करु नये तसेच ईतर जिल्हयामध्ये जाण्याकरीता बाहेर पडू नये. नियमाचे उल्लंघन करताना मिळुन आल्यास नियमानुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची सर्व नागरीकांनी नोंद घेवुन पोलीस प्रशासनास सहकार्य करावे. असे चंद्रपुर पोलीस दलातर्फे आवाहन करण्यात येत आहे.

---

## चंद्रपुर पोलीसांकडुन ६१ चेकपोस्टवर होत आहे तपासणी...

कोरोना विषाणुच्या पार्श्वभुमिवर चंद्रपुर जिल्हा पोलीस दल आपल्या पुर्ण तयारीनिशी सज्ज आहे. पोलीस अधीक्षक, चंद्रपुर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस दलातील सर्व अधिकारी व कर्मचारी हे दैनंदिन कर्तव्य बजावत अहोरात्र काम करीत असुन चंद्रपुर पोलीसाकडुन जिल्हयात एकुण ६१ ठिकाणी चेक पोस्ट तयार करण्यात आले आहे.

लॉकडाउनचा आदेश प्राप्त झाला त्यादिवसापासुनच चंद्रपुर पोलीस दलाकडुन जिल्हयातील सर्व सिमा बंद करण्यात आल्या असुन अत्यावश्यक कारणाशिवाय व विनापासशिवाय कोणालाही जिल्हयात व जिल्हयाबाहेर प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. याकरीता चंद्रपुर जिल्हयातुन बाहेर राज्यात जाणारे सिमा तसेच बाहेर जिल्हयात जाणारे सिमा व जिल्हयातील मुख्या मार्गावर चेकपोस्ट असे एकुण ६१ चेकपोस्ट सुरु करण्यात आले आहे. या प्रत्येक चेकपोस्ट सुसज्ज असे बॅरीकेडींग करण्यात आलेले असुन सदर प्रत्येक चेकपोस्टवर सबंधित पोलीस स्टेशनमधुन १ अधिकारी व ८ ते १० पोलीस कर्मचारी यांना नेमण्यात येत आहे. कर्तव्य बजावत असलेल्या या सर्व पोलीसांना त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने फेसशिट मास्क, सॅनिटायझर, हॅन्डवॉश, ग्लोज इत्यादी आवश्यक सर्व साहीत्य पोलीस विभागाकडुन देण्यात आलेले आहेत. चंद्रपुर पोलीस दलातर्फे आवाहन करण्यात येत आहे की, अत्यावश्यक बाब वगळता(मेडीकल) विनापास/विनापरवानगी कोणीही दुसऱ्या जिल्हयातुन चंद्रपुर येथे प्रवेश करु नये तसेच ईतर जिल्हयामध्ये जाण्याकरीता बाहेर पडू नये. नियमाचे उल्लंघन करताना मिळुन आल्यास नियमानुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची सर्व नागरीकांनी नोंद घेवुन पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.

---

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२८ एप्रिल, २०२०

☎ : 07172-264300

: 07172-255800

: 7447744100 (PRO)


# सावली पोलीसांनी ट्रकमधुन प्रवास करणाऱ्या ७० लोकांना घेतले ताब्यात तिन ट्रक चालकांविरुध्द गुन्हा नोंद.

कोरोना विषाणुच्या पार्श्वभुमिवर चंद्रपुर जिल्हा पोलीस दल आपल्या पुर्ण तयारीनिशी सज्ज आहे. पोलीस अधीक्षक, चंद्रपुर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस दलातील सर्व अधिकारी व कर्मचारी हे दैनंदिन कर्तव्य बजावत अहोरात्र काम करीत आहे.

सावली पोलीसांनी या पार्श्वभुमिवर वैनगंगा नदी चेकपोस्टवर नाकेबंदी दरम्यान तिन ट्रक क्र. १) सीजी १३ एल ०८४५, २) सीजी ०७ सी ४४६२, ३) सीजी ०७ सीए ०९२५ चेक केले असता, ट्रक मध्ये विनापरवाना प्रवास करणारे एकुण ७० मजुर मिळुन आले. सदर तिनही ट्रक चालकांविरूध्द कलम ३७(१), १३५ म. पो.अ.सहकलम ६६/१९२मोवाका सहकलम २,३ साथीचे रोग अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन तिनही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर मजुर हे आंध्रप्रदेश राज्यातुन छत्तीसगड राज्यात जाणार असल्याची माहिती समोर येत असुन त्यांना संस्थानिक विलगीकरण करण्यात आले आहे. पुढिल तपास सावली पोलीस करीत आहे.

———————————————————————————